# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र. ७६६/२०२२/जळगाव**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| श्री. राजेंद्र शामराव बारी, रा.श्रीरामनगर, यावल, ता.यावल, जि.जळगाव. | बांधकाम अभियंता, यावल नगरपरिषद कार्यालया, यावल, ता.यावल, जि.जळगाव. | मुख्याधिकारी, यावल नगरपरिषद कार्यालय, यावल, ता.यावल, जि.जळगाव. |

**सुनावणी दिनांक — २६/११/२०२४**

**१. उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | उपस्थित | उपसिथत | उपस्थित | उपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : ०१/०२/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : --------

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : यावल नगरपरिषद कचरा डंपीगचे होणाऱ्या बांधकामाबाबत माहिती मिळण्याबद्दल.

**३. माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २५/१०/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २५/१०/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : २०२०-२०२१

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** यावल न.पा.कचरा डंपीगचे होणारे बांधकामाबद्दल माहिती. १) सदरील कामाचे इस्टुमेंट. २) कंत्राटदाराचे नाव, ३) ठरावाची नक्कल, ४) दिलेल्या कार्याचे आदेशापासून ते आजपर्यंतचे कंत्राटदारास दिलेल्या रक्कमेचे मुळ प्रमाणक सत्य प्रती, ५) थर्ड पार्टी ऑडीटचे पूर्ण कागद पत्र, ६) थर्ड पार्टी यांनी सादर केल्या कामाचे फोटो व त्याचा अहवाल.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा बांधकाम अभियंता, यावल नगरपरिषद कार्यालय, यावल, ता.यावल, जि.जळगाव. यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

**४. प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०३/१२/२०२१

(२) प्रथम अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०३/१२/२०२१

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहितीच्या अधिकाराच्या अर्जामध्ये नमूद केलेली व मागितलेली माहिती उपलब्ध झालेली नाही.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिल अर्जावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,

यावल नगरपरिषद कार्यालय, यावल, ता.यावल, जि.जळगाव. यांनी सुनावणी घेऊन आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही.

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा** —

(१) **विद्यमान जन माहिती अधिकारी** — अपिलार्थी यांचा दि.१३/०८/२०२२ रोजीच्या विनंती अर्ज सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९(३) मधील तरतुदीनंतर दि.०१/०२/२०२२ रोजीचे द्वितीय अपिल आपणाकडे दाखल केले होते. तरी संदर्भीय अपिलातील माहिती विषय यावल नगरपरिषद कचरा डंपीगचे होणाऱ्या बांधकामाबाबतची माहिती मला जन माहिती अधिकारी यांचे कडून मिळालेली आहे. व मला मिळालेली माहिती ही समाधानकारक आहे तरी माझा अर्ज निकाली काढण्यात यावा.

६. **निष्कर्ष** —

(१) अपिलार्थी यांच्या लेखी विनंती अर्जावरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरविली असुन त्या माहितीने त्यांचे समाधान झाले असल्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिल निकाली काढण्याची विनंती केल्याचे दिसून येते.

(२) प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.७६६/२०२२/जळगाव निकाली काढण्यात येत आहे.

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**जावक क्र.** ३५४९

14 MAY 2025